# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक १० | मुंबई | एप्रिल, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**

*संपादकीय*

## खादाडी-काल आणि आज

**—सुहासिनी कीर्तिकर**

'झी युवा' वर सध्या एक मालिका चालू आहे. त्यात शशांक केतकर आहे म्हणून ती मी हल्ली पहातेय. पाहण्या न पाहण्याचा सवाल नाही. त्या मालिकेच्या शीर्षक गीतात येणाऱ्या एका बाबीबद्दल इथं मला व्यक्त व्हायचंय. गावाकडे असलेल्या 'रिसॉर्ट' परिसरातील एक छोटी मुलगी त्या रिसॉर्टकुटुंबाचा जणू भागच. ती त्या गीतात म्हणते, ''गोड गोड आंबे, फणसाचे गरे; गावातला मेवा फस्त करू सारे''. साऱ्या जणांनी एकत्रित येऊन 'गावातला मेवा' फस्त करायचा; ही कल्पना आजचं आपलं जीवन, जगणं बघता तशी 'आऊटडेटेड' नाही वाटत? लहान मुलांचंच एक भातुकलीचं गीत आठवतंय का तुम्हाला? 'विहीणबाई, विहीणबाई उठा आता उठा' म्हणत बिच्चारी नवऱ्यामुलीची आई वस्तुस्थिती सांगते. 'तुम्ही केला चट्टामट्टा'. चट्टामट्टा करणंही आज फार फार मागे राहून गेलंय; असं नाही वाटत? फस्त करणं, चट्टामट्टा करणं, आटवलेल्या दुधाचं रिकामं टोप घासायला टाकण्यापूर्वी त्याची खमंग खरपूस खरवड चमच्यानं सफई ओरपणं, अगदी चमच्याचा वापर करीत वाटीतलं श्रीखंड समजा खाल्लं; तरी ताट पाटापासून दूर करताना बोटांनी ती वाटी निपटून, ती बोटं अलगद जीभेवर ठेवणं, चटपटीत - झणका असलेल्या लोणच्याच्या बरणीला तळ लागला की त्यात वरणाचं पाणी घालून, खार निपटून घेऊन ते पाणी जेवणाच्या शेवटी आचमनासारखं पिणं, लोणी कढवत असताना रवाळ तूप काढून घेतलं की घरभर त्याचा दरवळ पसरलेला असतानाच भांड्यातील तळाला असलेली बेरी - थोडीशी आंबटगोड- काढून घेऊन त्यात रवा परतून त्याचा 'केक' करून खाणं किंवा त्या बेरीतच साखर घालून ती चाखतमाखत खाणं, श्रीखंडासाठी दह्याचं गाठोडं टांगलं की त्यातून गळणारं पाणी साठवून जिरं पावडर अन् मीठ घालून तो 'स्वे' पिणं, अभ्यास करताना विरंगुळा म्हणून तोंडात 'मिठातलं लिंबू' ठेवणं किंवा चक्क हातावर मोरावळा ठेवून तो चाखतमाखत अभ्यास करणं.... या साऱ्या आजच्या संदर्भात किती 'जुनाट' गोष्टी वाटताहेत ना?

चिंचा, बोरं, तिखटमीठ लावलेल्या कैरीच्या फोडी, चिंचोके, बिलींब, करमरं यांचं शाळकरी वयातलं मैत्र पार पार संपून गेलंय. या शाळकरी वयात आणखी एक गंमत होती. बरोबरच्या मित्राला, मैत्रिणीला यातला वाटा द्यायचा खाता खाता; तर तो 'चिमणीच्या दातां'नी दिला जायचा. चिमणीचे दात? आपलं उष्टं द्यायचं नाही म्हणून त्यावर रुमाल टाकायचा अन् मग दातांनी खायच्या वस्तूचे तुकडे करून वाटण्या करायच्या. नाहीतरी शाळेतल्या त्या जुन्या काळात चिमणीकावळ्यांची कावकाव, चिवचिव बालपण भरूनच टाकायची हो! 'चिमणीच्या दातांनी' वाटण्या करायच्या. हव्या कशाला सुऱ्या न चाकू? काळीभोर पाटी पाण्यानं - कोळशानं घासून चकाचक करताना ती सुकवायची तर; तिला वरखाली करून म्हणायचं जोरात 'चिमणी चिमणी पाणी दे, कावळ्या कावळ्या वारा घाल.' सातवी आठवीतली एखादी मुलगी सलग काही दिवस शाळेत आली नाही की तिला 'कावळा शिवायचा'! चिमणी कावळेच कशाला? एखाद्या वात्रट पोराच्या दप्तरात (म्हणजे घरगुती कापडी पिशवीत) अगदी मोठ्ठ्या डोळ्यांचे बेडुकरावही असायचे बरं का. किंवा मग पायाला दोरी बांधलेला चतूर, फुलपाखरं धरून-मारून त्यांचे वहीच्या पानात ताणून बसवलेले पंख.... सगळी भोवतालची जीवंत सृष्टी शाळेतलं बालपण व्यापून

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## बांगडीपुराण

**-मीनाक्षी जयकर**

आज आमची कोळीण ताजेताजे बांगडे घेऊन आली होती. त्यामुळे साहजिकच जेवणात बांगड्याचा बेत ठरला होता. पण घाईघाईने स्वयंपाकाचं काम उरकण्याच्या गडबडीमध्ये आमच्याकडे जेवण बनवायला येणाऱ्या काकींच्या बांगड्या वाढवल्या. बांगडा आणि बांगडी हे दोन जवळपास सारखे भासणारे शब्द, इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या माझ्या मुलांच्या कानावर पडले. सोकाजींना बांगड्या म्हटले की बांगड्याचीच आठवण होणार; पण मुलं खरंच गोंधळली होती. त्यातून काकींच्या बांगड्या फुटल्या असं न म्हणता 'वाढवल्या' असं म्हटल्याने ती आणखीनच गोंधळून गेली. बांगड्या फुटल्या म्हणजे कमी झाल्या, मग त्या 'वाढल्या' कशा? हे काही त्यांना समजेना. त्यांना समजवता-समजवता माझंही विचारचक्र सुरू झालं- म्हणजे बांगडीसंबंघाने. (परभू आहे, परभांसाठी लिहिते आहे आणि तरीही 'बांगडा' सारखा खादाडीचा विषय सोडून 'बांगडी'वर लिहीत आहे!)

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीच्या शृंगारात बांगड्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. विवाहित स्त्रियांचं ते तर सौभाग्यलेणंच आहे आणि कुमारिकांसाठी शोभेचा अलंकार. बांगड्या म्हटलं की रसिकांच्या मनामध्ये खूप सारी रोमँटिक गाणी फेर धरू लागतात. 'चुडी नही, मेरा दिल है। देखो देखो टुटे ना' किंवा 'बिंदिया चमकेगी, चुडी खनकेगी' अशा गाण्यांमधून प्रियकर व प्रेयसीच्या पहिल्यावहिल्या प्रेमाची साक्षीदार म्हणून ती, म्हणजे चूडी अर्थातच बांगडी आपल्याला भेटते. प्रेयसीच्या हातातल्या बांगड्यांवरून घडलेली एक घटना मला प्रकर्षाने आठवते. 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांनी फार कलात्मकतेने एका चित्राचा आस्वाद घेतला होता. पलंगाच्या मंडपीला हात धरून एक स्त्री आपल्या प्रियकराची वाट बघत आहे असं ते चित्र होतं. चित्रात त्या स्त्रीच्या हातातल्या काही बांगड्या सरळ तर काही बांगड्या कलत्या झालेल्या, त्या चित्रकाराने दाखवल्या होत्या. एवढ्या बारीक तपशीलाचाही शि. म. परांजपे यांनी फार रसिकतेने आस्वाद घेतला होता. आपल्या रसग्रहणात ते म्हणाले होते की, जणू काही वाट बघून बघून त्या स्त्रीच्या हातातल्या बांगड्यांनीही आपली मान टाकली आहे. सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या काळातील हे रसग्रहण, त्याकाळी फारच पुरोगामी समजलं गेलं होतं. त्यावरून बराच गदारोळही उठला होता. पण आता काळ बदलला आहे. म्हणूनच जेव्हा एखादी तरुणी म्हणते, ''मेरे हाथोमें नौ नौ चुडियाँ है, जरा ठहरो सजन मजबुरियाँ है'' तेव्हा त्यात काही गैर किंवा उच्छृंकल न वाटता ते आपण सहज स्वीकारतो.

प्रेयसीचा हात आपल्या हाती असावा, लवकरात लवकर तिने आपल्या नावाचा हिरवा चुडा भरावा अशी गुलाबी स्वप्नं उतावीळ प्रियकर दिवसरात्र बघत असतो. पण तशी संधी मात्र त्याला जंगजंग पछाडूनही मिळत नसते. आणि मग आपली हीच प्रेयसी आपल्या हातात बांगड्या भरण्यासाठी स्वत:चा हात स्वखुषीने कासाराच्या हातात देते तेव्हा क्षणभर या प्रियकराला त्या कासाराची असूया वाटते. अशा असूयेच्या साक्षीदार असतात त्या फक्त बांगड्या. खूप चित्रपटांमध्ये म्हणूनच प्रेयसीला चोरून भेटण्यासाठी प्रियकर चुडीवाला (कासार) बनून जातो असा प्रसंग हमखास आढळतो.

बांगड्या फक्त कासारालाच रोजीरोटी देतात असं नाही, तर अनेकांना रोजगार पुरवतात असं म्हणतात. सोनार आपल्या बायकोच्या बांगड्या घडविताना-देखील सोनं मारतात. सोन्यात किती भेसळ केली आहे हे अंधारातील पाप फक्त ती बांगडीच जाणे. यदाकदाचित त्या बांगड्या बावनकशी असतील तर कधी अडीअडचणीच्यावेळी त्या सावकाराच्या तिजोरीत जाऊन

(पान २ कॉलम ३ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

असायची. असो.

तर.... गोष्ट चाललीय पूर्वीच्या 'खानपाना'ची. मनात आलं की चाललं बाहेर जेवायला. गंमत करायची तर 'जाऊ बाहेर डिनरला'. खूप दिवसात भेटलो नाही तर 'एकत्र अमकीतमकीकडे जाऊ अन एन्जॉय करू'... असं पूर्वीच्या काळी नव्हतं ना! हॉटेलमध्ये जायचं म्हणजे अपरिहार्य असलं तरच. एकटीनं तर कधीच नाही. रस्त्यावर उभं राहून पाणीपुरी, भेळ, रगडापॅटीस खाणं म्हणजे त्याकाळी 'घरदार नसलेल्यांची' लक्षणं. आज? खाण्यापिण्याच्या बाबतीत आपण किती मोठ्ठा काळ ओलांडून आल्यासारखं वाटतंय. चट्टामट्टा करणं, फस्त करणं, चाटूनपुसून ताट साफ करणं आज जणू समाजरितीत अडाण्याचं लक्षण झालंय. पूर्वी एखादी गोष्ट ताटात टाकून उठायला परवानगीच नसायची. 'टाकलंस तर ते डोक्याला घाशीन' अशा प्रेमळ (?) धमक्याही असायच्या. आज? आज आपण जेवतोच कुठे? उभ्याउभ्यानं 'डिश' मधलं खातो. जेवण असते का ते? छे! आपण फक्त 'कॅलरीज' खातो. उद्या एखादी जेवणाची गोळी आली तर तेही सोयीस्करच असेल. हो! पूर्वी 'आंघोळीची गोळी' असायची बरं का! आज असं चाटून पुसून, मिटक्या मारत आस्वाद घेणं म्हणजे अगदी गावंढळपणाच. 'बॅड मॅनर्स'. कुठं कार्यक्रमाला गेलं, तिथं उभ्यानं अन् स्वेच्छाभोजनाची सोय असली ('बुफे' किंवा 'बफे' हो!) तरी प्रत्येक पदार्थ बशीत घ्यायचा अन् चक्क टाकून द्यायचा. कारण खायला/जेवायला थोडेच त्या कार्यक्रमाला गेलेलो असतो? सतराशे साठ पदार्थ असतात तर ते सगळेच काय खाता येणार? म्हणून उष्टावायचे अन् टाकून द्यायचे झालं. अरे! पण स्वेच्छा भोजनाचा अर्थच काय मग? हवे ते घ्या, हवे तेवढेच घ्या. खा अन् देणाऱ्याला दुवा द्या. पण नाही! काळच बदललाय. चिमण्या हल्ली कमी झाल्यात, एकमेकांना चवीनं देण्याघेण्याचे 'चिमणीचे दात' कुठले उरायला? अन् मग नुसतं मिरवायचं ते केव्हा? उपचार पाळायचे ते केव्हा? असं हावरटासारखं खायचं असतं का? घरी 'चुलीपाशी' निरनिराळे पदार्थ करण्यात वेळ घालवायचा असतो का? ज्याचं त्यानं आपलं पोट पहावं अन् सांभाळावं. जिमला जा, वॉकला जा... पण जा... जा.... जाच. खा... खा.... खा नाहीच. मग अशावेळी मारे तत्त्वबित्त्व आठवायची बरं का. म्हणजे देवाने माणसाला जन्माला घातलं तेव्हा संस्कृती नियम आखून दिले म्हणे. दिवसातून तीन वेळा आंघोळ, दोन वेळा देवपूजा किंवा आरती आणि एक वेळ जेवण. पण माणूसच तो! त्यानं डोकं चालवलं अन् हे सारं बदललं. एक वेळ आंघोळ, एक किंवा अर्धवेळ पूजा अन् दिवसातून तीन वेळा (तीनत्रिकाळ) जेवण. पण हे आता बाद बरं का. आता परत येता जाता 'वॉश', पूजेचं समाधान म्हणून देवाला एक उडता नमस्कार आणि 'चारीठाव', मांडी पालथी घालून जेवण नाहीच. इल्ला! आता चट्टामट्टा, फस्त करणं.... सगळंच बाद. चहा प्यायचा तरी एक 'सिप' अन् खाली बाकीचा तसाच ठेवायचा. ग्लासमधलं सरबत (छे! छे! चुकलंच. 'ड्रिंक' हो!) खाली तळाला तस्संच उरवायचं. आपलं पोट म्हणजे का 'डस्टबीन' आहे? व्यायामानं ते सपाटीला आणायचं तर खाणंही मोजून मापूनच हवं ना?

हां! हे खाण्यापिण्याचे 'चोचले' बरेवाईट का असेनात; आपण काळाप्रमाणं बदलतो. ठीक आहे. पण 'वाचनाची भूक' मात्र आपली वाढतीच आहे हं. माझ्याकडं 'दृष्टिक्षेप' सदरासाठी पुस्तकं आली की मी सहज म्हणते, 'माझा खाऊ आला.' या बाबतीत आजही माणसाला किती खाऊ (किती किती वाचू) अस्सं होत असतं. अहो, म्हणून तर 'प्रभुतरूणा'चे सदस्य वाढताहेत ना? चांगलंच आहे. ही अशी भूक सदैव वाढतीच हवी. चांगलं 'चारीठाव' वाचनेच्छा संपन्न करणारी. तर मंडळी; या बाबतीत मीही 'भरल्या पोटी' आपलं वाचन वाढत राहो अशी शुभेच्छा देते.

✳

## अभिनंदन

✶ सौ. स्मिता जयकर यांचे 'माझी आई तिचा बाप' नाटकाचे प्रयोग मोहन जोशी या अभिनेत्यासह जोसात चालू आहेत. नीला सत्यनारायण यांनी भावानुवाद केलेले त्यांचे 'आता नाही तर केव्हा...?' हे अध्यात्माकडे सकारात्मक बघण्याची दृष्टी देणारे पुस्तक प्रसिद्ध झाले.

✶ सौ. स्मृति शीतल तळपदे यांचे होळीनिमित्त कथ्थक नृत्याचे प्रयोग झाले. त्यांना ११-३-२०१७ रोजी 'मधुवन चॅरिटेबल ट्रस्ट' या संस्थेतर्फे कथ्थक नृत्यासाठी 'मधुवन रत्न पुरस्कार' प्राप्त झाला.

✶ कै. नीरजा तळपदे यांनी लिहीलेले आणि सौ. रोनिका विजयकर यांनी गाईलेले गीत आकाशवाणी केंद्राने सादर केले.

✶ वि. ह. कुलकर्णी स्मृती पुरस्कारार्थ परीक्षकाचे काम सुहासिनी कीर्तिकर यांनी केले. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे दिल्या गेलेल्या पुरस्कारवितरण सोहळ्यात त्यांनी मनोगतही व्यक्त केले.

✳

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

बसतात. स्वत:चा मालक येऊन मला सोडवून जाईल या आशेवर जगत असताना या बांगड्या-पाटल्यांना गोरगरीबांची सावकारा-कडून होणारी पिळवणूक 'याचि देही याचि डोळा' पहावी लागते.

भारतीय संस्कृतीमध्ये बांगड्या सौभाग्यलेणं समजतात. महाराष्ट्रात हिरवा चुडा हे सुवासिनीचं प्रतिक मानतात. लग्नात हिरवा चुडा हातामध्ये भरल्यावर प्रेयसीच्या चेहऱ्यावर जी लाली पसरते त्याला कशाचीच उपमा देता येणार नाही. बंगाल्यांमध्ये काचेच्या लाल रंगाच्या बांगड्या आणि शंखाच्या पांढऱ्या रंगाच्या बांगड्या सुवासिनी हातात भरतात. काही राजस्थानी आदिवासी जमातींमध्ये पार कोपरापर्यंत लाखेच्या व काचेच्या तुकड्यांनी सजलेल्या लाल बांगड्या घालण्याचा रिवाज दिसून येतो. तर एखाद्या रंग-संगतीच्या बाबतीत जागरूक असणाऱ्या पुरंध्रीसाठी तिच्या हातातील बांगड्यांचा रंग, कानातील व गळ्यातील आभूषणांचा रंग तिच्या कपड्याप्रमाणे सदैव बदलत राहतो. हे रंगांचं साहचर्य आपल्या संस्कृतीतली कलात्मक वृत्ती दाखवतं. (या हिरव्या चुड्याचं महात्म्य कवी ग. दि. माडगुळकरांनी आपल्या एका कवितेत फार छान अधोरेखित केलं आहे. रणांगणावर जाणाऱ्या आपल्या मुलाला निरोप देताना सासू आपल्या सुनेला सांगते- ''दही घाल हातावरती, बाळ रणां जाई, चुडा तुझा सावित्रीचा, गडे सूनबाई!'')

या बांगड्यांचा नादही बरंच काही सांगून जातो. कविवर्य बा. भ. बोरकरांची 'पैंजणां' नावाची एक प्रसिद्ध कोंकणी कविता आहे. त्यातही प्रेयसी जेव्हा येते तेव्हा तिच्या पैजणांचा आणि कंकणांचा म्हणजे बांगड्यांचा होणारा नाद प्रियकराला भारून टाकतो असं वर्णन आहे. 'शब्देविना संवादू' साधण्यात तर या बांगड्यांचा हात कोणी धरू शकणार नाही. मित्रांच्या किंवा घरातील थोरामोठ्यांच्या संगतीमध्ये रमलेल्या आपल्या 'अहो'ना 'बायकोचा विसर तर पडला नाही ना?' असे सुचविण्यासाठी कित्येक गृहिणींनी बांगड्यांचा किणकिणाट आयुष्यात एकदा तरी केलाच असेल नाही का? आपल्या न विचारता घेतल्या गेलेल्या निर्णयाला आपली नापसंती दर्शविण्यासाठीही हाच मार्ग काहीजणी अजूनही वापरतात.

चुगली करण्यामध्येही बांगड्या माहीर असतात. याचा एक सुंदर किस्सा एका प्रथितयश नटाने एका मुलाखतीत रंगवून सांगितला होता. ऐन उमेदीच्या काळात छोट्या घरात एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये राहताना या कलाकाराला आणि त्याच्या बायकोला स्वयंपाकघरात झोपावं लागे. रात्री बांगड्यांची किणकिण ऐकू येऊ नये म्हणून मग हा कलाकार बायकोच्या बांगड्या रुमालाने बांधून ठेवत असे.

पण बांगड्यांच्या नशिबी फक्त सुखच नाही; तर अपार दु:खही येतं. सौभाग्याचं प्रतिक असल्याने वैधव्य आल्यावर याच बांगड्या बळजबरीनें फोडल्या जातात. आपण आपला खंबीर आधार कायमचा गमावला या दु:खाची दाहकता स्त्रीला आतून जाळत असते आणि तिच्या या दु:खाचा हुंकारच जणू या तुटणाऱ्या बांगड्या जगासमोर आणत असतात. बलात्कारासारख्या घृणास्पद कृत्याच्या साक्षीदार होण्याचे भोगदेखील याच बांगड्यांच्या नशिबी असतात. त्यामुळे 'वाटेवरती काचा गं!' असे बोल त्यांच्या तोंडून वेळोवेळी निघत असतात. वैधव्याचं प्रतिक म्हणून 'बांगडी फुटणे' असा उल्लेख अनेक बखरींमध्येदेखील आढळतो. पानिपतच्या लढाईच्यावेळी 'कित्येक लाख बांगड्या फुटल्या' हा उल्लेख सर्वश्रुत आहे. फाळणीच्यावेळीदेखील प्रेतं व फुटलेल्या बांगड्यांच्या काचानी किती ट्रक सीमेपलिकडून आले याचं वर्णन वाचताना अंगावर शहारे येतात.

या बांगड्यांचे प्रकार तरी किती? पाटल्या-बांगड्या, तोडे, पिछोड्या, जाळीच्या बांगड्या, जोडं ही काही वानगीदाखल नावं. पूर्वी पुरुषही हातात विशिष्ट प्रकारचे तोडे घालत. आपल्याकडेही लग्नात किंवा समारंभाच्या प्रसंगी पुरुष तोडे घालत. आजकाल परत ही पद्धत रूढ होताना दिसत आहे.

बांगड्या या पवित्र प्रेमाच्या, त्यागाच्यापण साक्षीदार असू शकतात हे रसिकांना कळून आलं ते 'वहिनीच्या बांगड्या' या चित्रपटामुळे. मातृसुखाला पारखा झालेला दीर आणि पुत्रसुखापासून वंचित राहिलेली वहिनी यांच्या निर्मळ प्रेमाची अत्यंत जिव्हाळ्याने चित्रित केलेली ही कौटुंबिक कलाकृती.

आमच्या लहानपणी कॅलिडोस्कोप मिळायचा. त्यात काचेच्या बांगड्यांचे अनेक तुकडे असायचे. त्या तुकड्यांनी विविध मनमोहक रंगसंगतीचे आकार तयार व्हायचे. बांगड्यांच्या काचांचे तुकडे मेणबत्तीवर एकमेकांना जोडून त्याची तोरणं, पडदेही बनवत असू. दारातून जाता-येता त्या पडद्याचा किणकिणाट मन मोहून टाकत असे. 'काचापाणी' तर आवडता खेळ. आता हे काचेचे तुकडे मागे पडले आणि प्लास्टिकच्या काड्या घेऊन मिकाडो खेळतात. 'कालाय तस्मै नम:' दुसरे काय?

या बांगड्यांनी मराठी भाषादेखील समृद्ध केली आहे. 'हातच्या कांकणाला आरसा कशाला?' 'कांकणभर सरस असणं', 'हातात बांगड्या भरणं' यासारखे अनेक वाक्प्रचार, वाक्य सामान्यांच्या तोंडात अगदी सहज येतात. 'हातात बांगड्या भरणं' या प्रकाराला तर राजकारणीदेखील घाबरतात.

(पान ६ कॉलम १ वर)

कथाकली

# एम्.एच.एस्.आर.आय.पी.

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

निर्मला आणि अर्चना दाराला कुलूप लावून शेजारच्या घरात शिरल्या. दरवाजा उघडाच होता. बाहेरच्या खोलीत राजाभाऊ बसलेले होते. त्यांनी खुणेनंच या दोघींना आतल्या खोलीत जाण्यास सुचवलं. आत कांचन बसली होती. पलंगावर नलिनीताईंचा निष्प्राण देह पहुडला होता. त्यांच्या अंगावर एक भरजरी साडी नुसतीच घडी उघडून पसरलेली दिसत होती.

कांचनच्या शेजारी बसत निर्मलानं विचारलं - 'कांचन, अगं कितीची वेळ दिलीय सगळ्यांना?'

'दहाची'

'पण आता तर अकरा वाजत आले. अजून कोणीच कसं ... अं... कळवायचं राहिलंय का बऱ्याच जणांना? असलं तर सांग. मी कळवते.' असं म्हणत त्यांनी हातातला मोबाईल सरसावला.

'नको. सकाळीच फेसबुकवर बातमी टाकली. एव्हाना सगळ्यांचे मेसेजेस आलेच असतील.'

निर्मलाचा प्रश्नांकित गोंधळलेला चेहरा बघून अर्चना म्हणाली, 'अगं आई, हल्ली असंच करतात. प्रत्येकाला व्यक्तिशः फोन करायची गरज नसते. जग जवळ आलंय अगदी...'

जवळ आलंय की लांब गेलंय कुणास ठाऊक?... निर्मलाच्या मनातला गोंधळ कमी होण्याच्या आत दोन बायका खोलीत आल्या... ''फेसबुक बघितलं नी निघालो लगेच. कांचन, अगं तुझ्या आजोळचं कुणीच नाही आलं?''

''नाही उमाआत्या. अगं मामा कुठेही जाऊ शकत नाहीत. त्यांच्यासाठी मामीला घरीच थांबायला लागतं. दोन्ही मावश्या आणि त्यांचे नवरे तर जगातच नाहीत. या सगळ्यांच्या मुलांचं म्हणशील तर वेळ कुठंय कुणाला? कुणी कुणी तर परदेशातच आहेत'- कांचन उत्तरली.

'हंऽऽ, ते खरंच म्हणा! म्हणून तर तुझ्या काकांकडचंही कुणी दिसत नाहीय. आम्ही तसं तर राजाच्या आतेबहिणी. आम्हाला येणं जमलं म्हणून आलो. आमची तरी मुलं, सुना, जावई कुठे येणारेत? हल्ली तुम्हा तरूण मंडळींना सुट्ट्याच घेता येत नाहीयेत' - उमाआत्या उत्तरली.

तेवढ्यात दुसरीनं विचारलं - 'अगं, पण अंत्ययात्रेची तयारी कोण करणार?... की सोसायटीचेच लोक...?'

'नाही सुनिताआत्या. अहो सोसायटीच्या लोकांना कशाला त्रास? आणि ते तरी घरी कुठे असतात? काही बायका आणि पुरुष सकाळीच येऊन दर्शन घेऊन गेले' कांचन उत्तरली आणि पुढे म्हणाली - 'आईनं देहदान केलंय. हॉस्पिटलला फोन केलाय. ते लोक आता येतीलच थोड्या वेळात.'

'कांचन, अग नलिनीताई सवाष्ण आहेत. त्यांच्या अंगावर चार दागिने तरी घाल.' निर्मला न राहवून म्हणाली.

'नको मावशी, एक तर दागिने बँकेत लॉकरमध्ये आहेत. थोडे आहेत घरी. पण आता घालायचे नी हॉस्पिटलचे लोक आले की काढायचे. नाही सहन होणार मला. शिवाय आईचीसुद्धा हीच इच्छा होती की घरी, दारी कुणालाही कसलाही त्रास होता कामा नये. शिवाय प्राणाशिवाय देह म्हणजे एक कव्हर फक्त'.

'त्रास कसला गं त्यात? माणसांनी माणसांसाठी एवढंसुद्धा करायचं नाहीय का?'

'ते सगळं खरं हो. पण हल्ली हे खरंच कुणालाही आवडत नाही. कुठेही जायला जमत नाही. लोक लांब लांब राहतात. येणं जाणं सगळंच कष्टदायक असतं आपल्या पिढीला. तरुण पिढीला वेळच नाही. कधीतरी अत्यंत नाईलाजास्तव मनात चडफडत सुट्ट्या घेऊन यायला लागतं त्यांना. तसंही नातेवाईकांच्या बाबतीत तरुण पिढी कुठे उत्सुक असते? जीवंतपणी भेटायला नको असतं त्यांना. आता तसंही सगळ्यांना एक दोनच मुलं असतात. नातेवाईकांचा घोळका असतोच कुठे? जमलंच तर अंत्ययात्रेला जमतात तेव्हा कुणी स्वतःच्या परदेश वाऱ्यांचं वर्णन ऐकवतं. नाहीतर नातेवाईकांच्या मुलामुलींची लग्नं जमवण्याची खटपट चालूच असते. शेवटी महत्त्वाचं काय? जाणाऱ्या जीवाला शांतपणे निरोप देणं, त्या व्यक्तीच्या आत्म्याला चिरशांती लाभो ही प्रार्थना करणं. ते तर प्रत्येकाला घरबसल्या करता येतंच की! फेसबुकवर टाकलेल्या फोटोला नमस्कार करायचा नी एम. एच. एस. आर. आय. पी. पोस्ट करायचं की झालं सांत्वनाचं काम' - उमाआत्या म्हणाली.

'म्हणजे? काय पोस्ट करायचं म्हणालात?' - निर्मलानं न कळून विचारलं.

'म्हणजे 'मे हिज/हर सोल रेस्ट इन पीस' कुणीतरी उत्तरलं, 'तसंही नंतरसुद्धा भेटायला येणाऱ्या प्रत्येकाला तेच तेच सांगायचं - जाणारी व्यक्ती कशी गेली, काय झालं, किती दिवस आजारी होती, कोणते डॉक्टर, ट्रीटमेंट नीट झाली की नाही याची उलटसुलट चर्चा, तेरा दिवस लोक येणार म्हणून जबरदस्तीनं दिवाणखान्यात बसून राहायचं... नको वाटतं ते सगळं.'

''पण लोक येतात, बोलतात. त्यानं घरच्यांचा वेळ जातो, बरं वाटतं' - निर्मलानं बोलण्याचा प्रयत्न केला.

पण पटकन अर्चनानं विषय तिथंच संपवला - 'आई ते जुनं झालं. आता काळाबरोबर पावलं टाकायची. पुन्हा घरच्यांना तेरा तेरा दिवस सुट्ट्या कशा घेता येणार? हा प्रश्न असतोच. काही काही जाती धर्मांमध्ये तर दुखवट्याला जातात तेव्हाही एक शब्दही बोलायचा नसतो. त्यापेक्षा हे बरंय नं! शांतच बसायचं तर आपल्याच घरात बसून प्रार्थना करावी.' आपणच आपल्या व्यक्तीच्या आठवणी मनात जाग्या करीत राहायचं. पुष्कळजण 'दुखवट्याला येऊ नये' अशी नम्र सूचना करतात किंवा एखादा हॉल घेऊन विशिष्ट दिवस, वेळ कळवतात. तिथंही लोक 'एवढं जाहीर केलंय तर जायलाच हवं. नाहीतर वाईट दिसेल' याच भावनेतून कसबसं जाऊन येण्याचं 'कर्तव्य' पार पाडतात.


'ते सगळं खरं गं - पण जीवंत व्यक्तीच्या हाताचा पाठीवरून फिरणारा सांत्वनाचा हात तुमचं फेसबुक फिरवणार आहे का?'

'गरजच काय त्याची आई? अगं माणूस एकटाच येतो, एकटाच जातो. मग प्रत्येक पावलावर जीवंत माणसाला साथ, सोबत का लागते? आणि जी मिळते ती तर वरवरचीच असते नं? अगदी नवरा बायको, आईवडील मुलं सोडली तर बाकी सगळी वरवरचीच नाती. शेवटी काय 'जन पळभर म्हणतील हाय हाय' हेच खरं नं? शिवाय फेसबुक आहेच की वाटलं तर चार गप्पा मारायला. तेही आपल्या सोयीनं, सवडीनं...'

खरंय... निर्मलाच्या मनात येत होतं - अनोळखी लोक निदान हेवेदावे न करता, टोमणे न मारता चार अवांतर विषयांवरच्या गप्पा मारतात. मन रमणं न रमणं हे प्रत्येकावर अवलंबून असतं. कालांतरानं माणसांचा आवाजही ऐकू येणं दुष्प्राप्य होऊन जाईल बहुतेक. अर्चना एवढं, सांगतेय म्हणजे तिच्याही मनात हेच असेल का? उद्या मी किंवा 'हे' गेलो तर आमचं तरी कोण करणार?- निर्मलाचा निश्चय पक्का झाला - आपणही देहदानच करायचं नी 'यां'ना सुद्धा हेच पटवायचं. थेट देवाशीच संवाद साधणारच आहोत ना आपण? मग माणसांशी कशाला?.....

*

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



## पाठारे प्रभु महिला समाजाची उद्योजक कार्यशाळा

बुधवार, दि. २१ मे २०१७ रोजी खारच्या सांस्कृतिक केंद्र सभागृहात सकाळी १० ते ६ उद्योजक कार्यशाळा घेण्यात येईल. कार्यशाळेत श्री. सुदेश प्रबोध देसाई उद्योजकांना मार्गदर्शन करतील. त्यानंतर चॉकलेटच्या पुष्पगुच्छाचे प्रात्यक्षिक सौ. गौरी हिरेन नायक (सकाळी १०.३० ते ११.१५) दाखवतील. आर्ट ज्वेलरीचे प्रात्यक्षिक श्रीम. छाया दीपक तळपदे ११.१५ ते १२.०० या वेळात सादर करतील. दुपारी १२ वाजता सौ. प्रज्ञा जोगळेकर (केव्हीआयसीच्या डायरेक्टर) यांचे मार्गदर्शन असेल. १२.३० ते १ या वेळात बँक अधिकाऱ्यांचे अर्थसहाय्यासाठी मार्गदर्शन लाभेल. दुपारी २ ते ३ या वेळात बेसनाच्या प्रतिकृतींचे प्रात्यक्षिक किरण कमलाक्ष कोठारे दाखवतील; तर सौ. रीना मनिष धैर्यवान मेणबत्त्या तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवतील. सौंदर्य प्रसाधनाचे सौ. शिल्पा बैजू अजिंक्य आणि सौ. बिंबा मनोज नायक शुगर क्राफ्टचे प्रात्यक्षिक दाखवतील. या उद्योजक कार्यशाळेसाठी रु. ३००/- शुल्क असून १० मे पर्यंत नाव नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी केलेल्यांनी सकाळी ठीक ९.०० वाजता उपस्थित रहावे. दुपारचे भोजन आणि चहाची व्यवस्था महिला समाज करणार आहे. अधिक माहितीकरिता चिटणीसांकडे चौकशी करावी.

*

## पाठारे प्रभू सोशल समाज

रविवार, दि. १२ फेब्रुवारी २०१७ रोजी खारच्या हाऊसिंग सोसायटीच्या सभागृहात पाठारे प्रभु सोशल समाज व पाठारे प्रभु को. ऑप. हा. सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी, चित्रकला व हस्तकला, फॅन्सीड्रेस, संगीत व एकपात्री अभिनय स्पर्धांचे परीक्षण कु. रश्मी लपालिकर यांनी केले. निकाल जाहीर करताना परीक्षकांनी बहुमोल सल्ले दिले. परीक्षकांचा परिचय समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती जयकर यांनी करून दिला व त्यांना श्रीमती वंदना नवलकर व श्रीमती वृंदा जयकर यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विजेत्या स्पर्धकांना समाजाचे विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर व श्रीमती वृंदा जयकर यांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रेही देण्यात आली. स्पर्धांची जबाबदारी व सूत्रसंचालन चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी उत्तमरित्या सांभाळले. कार्यकारी समितीने त्यांना उत्तम साथ दिली.

स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे -

१) रांगोळी स्पर्धा - (वेळ १ तास)
अ - गट - १५ वर्षाखालील
विषय - बदक
प्रथम क्रमांक : कु. वरुण राकेश राणे
द्वितीय क्रमांक : कु. चैतन्या नितीश कीर्तिकर
तृतीय क्रमांक : कु. रितिका राहुल जयकर
ब - गट - १५ वर्षावरील
विषय - मोर
प्रथम क्रमांक - सौ. रेश्मा प्रसाद कोठारे
द्वितीय क्रमांक - सौ. शुभांगी निलेश कोठारे
तृतीय क्रमांक - सौ. श्वेता असित तळपदे

२) चित्रकला स्पर्धा (वेळ ३० मिनिटे)
अ - गट - ५ ते ८ वर्षे
विषय - वाढदिवसाचा केक (बर्थडे केक)
प्रथम क्रमांक - कु. पर्जन्य पवन कीर्तिकर
द्वितीय क्रमांक - कु. चैतन्या नितीश कीर्तिकर
तृतीय क्रमांक - सौ. आकांक्षा प्रसाद कोठारे
ब - गट - ९ ते १५ वर्षे
विषय - हाताच्या पंजापासून चित्रकला (पामपेंटींग)
प्रथम क्रमांक - कु. अनन्या अश्लेष वाझकर
द्वितीय क्रमांक - कु. वरुण राकेश राणे
तृतीय क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे
क - गट - १५ वर्षावरील
विषय - आवडता खाण्याचा पदार्थ
प्रथम क्रमांक - सौ. प्रांजल पवन कीर्तिकर
द्वितीय क्रमांक - श्री. उमंग कैलास कीर्तिकर
तृतीय क्रमांक - सौ. शुभांगी निलेश कोठारे

३. हस्तकला स्पर्धा - (वेळ ३० मिनिटे)
अ - गट - ५ ते ८ वर्षे
विषय - आगपेटीच्या काड्यांपासून घर बनविणे.
प्रथम क्रमांक - कु. पर्जन्य पवन कीर्तिकर
द्वितीय क्रमांक - कु. अवंती असित तळपदे
तृतीय क्रमांक - कु. अश्विन असित तळपदे
ब - गट - ९ ते १५ वर्षे
विषय - क्रेप पेपरचा नेकलेस करणे
प्रथम क्रमांक - कु. अनन्या अश्लेष वाझकर
द्वितीय क्रमांक - कु. रितिका राहुल जयकर
तृतीय क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे
क - गट - १५ वर्षावरील
विषय - पूजेची थाळी सजविणे
प्रथम क्रमांक - सौ. प्रांजल पवन कीर्तिकर
द्वितीय क्रमांक - सौ. वैदेही राकेश राणे
तृतीय क्रमांक - सौ. शुभांगी निलेश कोठारे

४ - संगीत स्पर्धा
अ - गट - ५ ते ८ वर्षे
विषय - कविता सादर करणे पोएम (पाठांतर आवश्यक)
प्रथम क्रमांक - कु. चैतन्या नितीश कीर्तिकर
द्वितीय क्रमांक विभागून - कु. आकांक्षा प्रसाद कोठारे, कु. पर्जन्य पवन कीर्तिकर
तृतीय क्रमांक - कु. किमया अपूर्व कोठारे
ब - गट - ९ ते १५ वर्षे

(पान ६ कॉलम ३ वर)

## रूढी-परंपरा

**-रंजना मा. तळपदे**

''हॅलो... पमा... अगं मंगळवारी माझ्याकडे हळदी कुंकवाला यायचं बरं का. निमू, उषा, सिंधू तुम्ही पण यायचं बरं का. अय्या मी कलाला फोन करायला विसरली. पण कशी करू? तिच्या बरोबर तिची बहीण माला व मुलगी शालूपण राहते. त्यांना नाही बोलावले तर बरोबर दिसणार नाही. कारण माला विधवा आहे आणि हे आपल्या रूढी-परंपरेमध्ये बसत नाही.''

वरील संवाद हा प्रातिनिधीक आहे का? माझे विचार मात्र वेगळेच आहेत.

मला एवढेच म्हणायचे आहे की या रूढी-परंपरा वगैरे आता थोड्या गुंडाळूनच ठेवायला पाहिजेत. आता हेच बघा; आपली पाठारे प्रभू ज्ञाती ही हौशी, पापभिरू, परंपरांना जपणारी व तेवढीच सुसंस्कृत आणि मेहनती आहे. वरील संवादावरून तुम्हाला कळले असेलच की पुष्कळ घरात भेदभाव केला जातो, त्यामुळे मानहानी सहन करावी लागते. म्हणून त्या परंपरांना थोडी मुरडही घातली पाहिजे.

पुष्कळ कुटुंबात आपण पाहतो की ठराविक फळे ठराविक पूजेला लागतात. उदा. राजेळी केळी, लाल केळी किंवा सटाच्या वेण्या. हौसेखातर करणे वेगळे व परंपरा म्हणून वेगळे. देवाला काय दोन हात जोडले तरी पोहचतात. हल्लीची पिढी तर या सर्वांतून अलिप्तच आहे. म्हणून त्यांना त्याचे काही वाटत नाही. आपल्यात असे व तुमच्यात तसे हे वर्गीकरण होता कामा नये. हे सर्व करण्यापाठी धार्मिक भावना असते. कबूल. पण ६०-७० वर्षांच्या महिला याच्यात भरडून निघाल्या आहेत. तेसुद्धा नोकरी, घर-दार सांभाळून. त्यामुळे त्यांचा सर्व उत्साहच मावळला आहे. म्हणून माझ्या मते झेपेल तेवढ्याच रूढी पाळाव्यात. सासूने दिले म्हणून मी सुनेला देणार हे साफ चुकीचे आहे. आपण नेहमी म्हणतो 'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' मग का आपण आपल्या पासूनच सुरू करायचे नाही? ही अतिशयोक्ती वाटत असेल तर तसे तुमचे अभिप्राय द्या.

जग इतके पुढे गेलं आहे की घरातील एकमेकांतपण बोलायला वेळ नसतो. काही नोकरी करणारी जोडपी तर इतकी रस्सीखेच करतात की सकाळी मुलांना क्रचमध्ये सोडायचे व संध्याकाळी उशीरा परतताना घरी आणायचे. काही जणांकडे तर बायाच मुलांचे सर्व बघत असतात. आज सर्वांकडे पैसा आहे तर सर्वांना परवडते. म्हणून या परंपरा जोपासायला वेळच नसतो.

मी तर असे सुचवू इच्छिते की यातून सुटका म्हणून काही साहित्याचे खाद्यपदार्थ मिळाले तर कदाचित आपल्याकडच्या बुरसट विचार करणाऱ्यांमध्ये थोडा प्रकाश पडेल व काहीतरी क्रांती घडून येईल. बदल ही नेहमी यशाची पायरी असते.

आपली ज्ञाती ही सुसंस्कृत, शिकलेली व हौशी समजली जाते मग बुरसटलेले विचार बाळगून काय मिळणार? म्हणून आपल्याकडे सामाजिक क्रांती ही झालीच पाहिजे. पुष्कळ घरांमध्ये थोड्या प्रमाणात बदल घडलेत. पण पूर्णपणे नाहीत. जर १०० टक्के बदल घडून आले तर आपल्या जीवनाचे सार्थक होईल आणि आणखी काही उत्तेजनात्मक वातावरण निर्माण होईल, जे पुढे समाजाच्या दृष्टीने हितकारक ठरेल.

हा लेख वाचून मला खात्री आहे की तरूण पिढी नक्कीच साथ देईल व हे विचार एका साठी उलटलेल्या बाईचे आहेत हे देखील वाचून आश्चर्य वाटेल. पण सुरुवात ही कुठूनतरी व्हायलाच हवी. मला विश्वास आहे की माझ्याशी सहमत पुष्कळ जणी होतील कारण रूढी परंपरा पाळणे हे काही सोपे नाही आणि सोडणं तर त्याहूनही कठीण. पण हल्लीची जीवनशैलीच बदललेली आहे. त्यामुळे असे बदल होणे अतिशय गरजेचे आहे. तरच सर्व घरातील प्रौढ तरूण मोकळा श्वास घेऊ शकतील व गुण्यागोविंदाने आपले उर्वरित आयुष्य जगतील.

आपण पूर्वीपासूनच सुधारक आहोत. पण परंपराप्रिय आहोत म्हणूनही या बदलाकडे सकारात्मकतेने आपण त्यामुळेच पहाल, अशी मला आशा आहे.

*

# 'पाठारे प्रभु सोशल क्लब हॉलिडे होम, अलिबाग; उद्घाटन सोहळा

पाच मार्चची पहाट. कधी नव्हे तो मुंबईच्या हवेत थोडाफार गारवा शिल्लक होता. साखरझोपेत होतो तोच पहाटे पाचचा गजर वाजला, फॉर अ मोमेन्ट मनात विचार आला; आज रविवार, तरी गजर का लावला? मग एकदम ट्यूब पेटली की विनोद प्रधान व जयंत किर्तीकरांनी फोन करून सांगितले होते की आज आपल्याला अलिबागला सोशल क्लबच्या हॉलिडे होमच्या उद्घाटनाच्या सोहोळ्याला हजर रहावयाचे आहे. आन्हिक उरकून रिक्षाने खारच्या डॉली स्टुडिओच्या समोर पोहोचलो. समोरच एक आलिशान वातानुकूलीत आरामगाडी उभी होती. बघतो तर काय; आमचाच पहिला नंबर! कोपऱ्यावर जयंत येण्याजाणाऱ्या रिक्षात डोकावून पाहात होते. हळुहळू रिक्षा येत गेल्या व आरामगाडी भरत गेली. जयंत हातात कागदाचा चिटोरा घेऊन एखाद्या शाळा-मास्तरप्रमाणे हजेरी घेत होता. बरोबर सात वाजता 'गणपती बाप्पा मोरया'चा गजर करीत आरामगाडी रवाना झाली. शिवाजी पार्कला थोड्या पालवावरच्या परभु मंडळींना सामावून घेत आम्ही अलिबागच्या वाटेला लागलो. गप्पागोष्टी चालू होत्या... 'कुणाचे जमले का?', असे नेहमीचेच विषय परत परत घोळत होते. साडेनवाच्या सुमारास आरामगाडी राजरस्ता सोडून उजवीकडे वळली. सगळ्यांनी खिडकीबाहेर डोकावले व डोळे उपहारगृहावर स्थिरावले. गरमागरम बटाटेवडे व मिसळ पावाशी दोन हात करून व चहा कॉफी घेऊन परत वाटेला लागलो. पावणे अकराच्या सुमाराला अलिबागमधील गोंधळपाडा येथे वळून आम्ही एका प्रशस्त सोसायटीच्या आवारात शिरलो. समोरच प्रसाद किर्तीकर आमचे स्वागत करावयास उभाच होता. उद्वाहनाने सर्वजण तिसऱ्या मजल्यावर पोहोचलो. उदय मानकर, नरेश मानकर फीत बांधलेल्या दरवाज्यासमोर उभे ठाकले होते. सोशल क्लबचे विद्यमान (मला विद्वान म्हणावयाचे होते का?) अध्यक्ष विनोद प्रधान व त्यांची सहचारिणी सौ. प्रतिमा प्रधान यांनी रीतसर फितेची गाठ सोडून क्लबच्या सुट्टीच्या घराचे (पाठून बायको म्हणते; पुरे झाले ते मायमराठीचे वेड. सगळ्यांना इंग्लिश अंडरस्टँड होते) तर; रीतसर हॉलिडेहोमचे उद्घाटन केले. प्रशस्त हॉल, नीटनेटके स्वयंपाकघर व दोन वातानुकूलीत बेडरूम्स आणि हो; दोन प्रसाधनगृहं पाहून मंडळींना जाणून आले की पदाधिकाऱ्यांनी घेतलेले अथक परिश्रम आज फळाला आले आहेत. सर्वांना शीतपेय पाजून पदाधिकारी पूजेच्या तयारीला लागले. गणपती पूजन प्रधानांच्या हस्ते यथासांग पार पडले. आरती झाली, प्रसाद (कीर्तिकर नव्हे!) वाटण्यात आला व सुरुवात झाली भाषणांना. विनोद प्रधान यांनी त्यांच्या भाषणात हॉलिडे होमची कल्पना व गरज कशी पुरवली गेली हे विदीत केले. जयंत किर्तीकरांनी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत हे सांगितले. दानशूर ज्ञातीयांनी अत्यावश्यक उदा. एसी, फ्रीज, टी.व्ही., गॅस, मिक्सर, भांडी इ. वस्तू दान केलेल्या आहेत. साधारण आठ व्यक्ती या हॉलिडेहोमचा उपभोग घेऊ शकतील आणि ज्यांना कुणाला या हॉलिडेहोमचा उपभोग घ्यायचा असेल तर कोणते सरळ साधे सोपस्कार पार पाडावयाचे हे ही सांगितले. नरेश मानकरांनी तर अथपासून इतीपर्यंत हॉलिडेहोमची कल्पना कशी उगम पावली व ती कल्पना पार पाडण्यासाठी कोणकोणते उपाय केले गेले हे सविस्तररित्या मांडले. आस्मादिकांनीही सोशल क्लबच्या या उपक्रमाचे स्वागत केले व पूर्वी आलेल्या अशा उपक्रमाच्या त्रुटी न येतील याची काळजी घेणे; असा प्रेमळ सल्ला देऊन सर्व भाषणांच्या गंगाजळीत आपली 'चवली' टाकली.

वृंदा जयकरनी सोशल क्लबच्या व्यक्तिगत आठवणी सांगत असताना हजर असलेल्या सिनियर सिटिझन्सच्या डोळ्यासमोर ते 'मंतरलेले दिवस' परत तरळले असणार. सोशल क्लबच्या या हॉलिडेहोमचा कसा उपभोग घ्यायचा याच विचारात असताना उपस्थित मंडळींना त्यांच्या उदरातील कावळे हळूवार आठवण देऊ लागले. कारण नाश्ता वडा व मिसळ पाव केव्हाच हजम झाले होते. आयोजकांनी हा हेतू हेरून आवराआवर सुरू केली व सर्व उपस्थितांना जवळच्याच उपहारगृहात चलण्याची विनंती केली. गणपतीपूजनाचा सोहळा पार पडल्यामुळे जेवणाचा बेत निरामिष होता. रविवार होता; तरी सर्वांनी चवदार जेवणाचा आनंद घेतला.

भोजनोत्तर परतीचा प्रवास सुरू करायचा बेत होता. पण हौशी परभु थोडीफार गंमत म्हणून दुपारच्या 'चांदण्यात' अलिबागच्या किनाऱ्याची सफर करावयास निघाले. काहीजणांनी तर चौपाटीवर कालाखट्टा गोळा देखील गट्टम केला.

अलिबागची आठवण म्हणून काही 'कर्तव्यदक्ष गृहिणींनी' माळीचे कांदे विकत घेतले व आरामगाडी मुंबईच्या वाटेला लागली. 'चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आले असेल

(पान ६ कॉलम ४ वर)

# महिला राज

-हेमंत विनायकराव तळपदे

साजरा करूया सारे आज  
'महिला दिन' असे नाव जगात  
शक्ति महिलांची बनो आता भारी  
राजदंड सत्तेचा राहो महिलांच्या करी

या फसव्या दुनियेची रीत लई न्यारी  
पुरूषी अहंकारा कदा दूर न सारी  
वरपांगी महिलांना सबला संबोधूनी  
अंतरंगी कृष्णपटल वसे दुराचारी

महिलांनो तुम्हा मी आर्जव करितो  
सन्मानाने जीवन तुम्ही जगावे आता  
काया अन् मने तुम्ही सशक्त होता  
दृष्टिकोन बदलेल या जगताचा

हा 'महिला दिन' स्मरेल खऱ्या अर्थाने  
अत्याचार, अपमान सरेल महिलांचा  
सन्मानाने जगेल जेव्हा ही महिला  
विश्वास रुजेल मनी या महिला दिनाचा

*

(८ मार्च या महिला दिनानिमित्ताने केलेली कविता -संपादक)

## महिला समाज बक्षिस समारंभ

पाठारे प्रभु महिला सामाजाचा १०२ वा वार्षिक बक्षिस समारंभ १९ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ५ वाजता बहुसंख्य श्रोत्यांच्या उपस्थितीत पार पडला.

प्रथम समाजाध्यक्ष सौ. नीता सेंजीत यांनी समारंभाच्या अध्यक्षा सौ. वीणा विकास मानकर व खास निमंत्रित केलेल्या सौ. जयश्री टी. कर्नाटकी यांचा परिचय करून दिला. त्यांना सुंदर गालीचे व तेलपोळ्या देऊन सन्मानित करण्यात आले. उपाध्यक्ष सौ. साया नवलकरांनी रौप्यपदक मिळालेल्या प्रतिष्ठित मंडळींची ओळख करून दिली. त्यांना रौप्यपदक, फुलांचा गुच्छ तसेच कै. श्री प्रमोद नवलकर लिखित 'स्मृतीगंध' हे पुस्तक देण्यात आले. यात उद्योजिका स्मृतिचिन्हाचा समावेश होता. समारंभाचे सूत्रसंचालन चिटणीस सौ. पल्लवी कोठारे यांनी केले.

सौ. जयश्री टी कर्नाटकींनी महिला समाजाच्या कार्यकारी भगिनींचे कौतुक केले. तसेच सौ वीणा विकास मानकर यांनी स्वाधार संस्थेचा उल्लेख करून गरजू महिलांना कर्ज मिळवून देण्याबद्दल सांगितले. करिअर करणाऱ्या मुलांनी, विद्यार्थ्यांनी प्रवासात जास्त वेळ खर्च करू नये. पाठारे प्रभु ज्ञातीत आल्यावर घरच्या मंडळींनी कसे सांभाळून घेतले याचाही त्यांनी उल्लेख केला.

समारंभाच्या अध्यक्षा सौ. वीणा विकास मानकर व श्री. विकास भगवान मानकर, तसेच श्री. व सौ. दिप्ती प्रकाश मानकर यांनी त्यांच्या मातोश्रीच्या स्मरणार्थ प्रत्येकी रु. १,००,०००/- महिला समाजाला देणगी दिली.

१) सौ. शिल्पा नवलकर - देशपांडे, २) सौ. कल्पना सुभाष कोठारे, ३) श्रीमती शिल्पा प्रकाश धुरंधर, ४) कु. चिन्मयी निखिल तळपदे या चार महिलांचा विशेष उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल विशेष गौरव केला. त्यांची ओळख संयुक्त चिटणीस सौ. रश्मा विजयकर यांनी करून दिली. स्मृतीगंध पुस्तक, ट्रॉफी व फुलांचा गुच्छ असे बक्षिसाचे स्वरूप होते.

पारितोषिक वितरण समारंभात शैक्षणिक बक्षिसेही दिली गेली. त्यात बक्षिस, फुलांचा गुच्छ, तसेच सौ. कल्पना कोठारे लिखीत 'मोरपीस' हा कथासंग्रह देण्यात आला.

श्रीमती नलिनी रामराव तळपदे यांची सुंदर रचना सौ. देवश्री निषाद धुरंधर यांनी सुरेल आवाजात संवादिनी श्री. शेषनाथ पावसकर व तबला श्री प्रदीप श्रीधर राणे यांच्या साथीने सादर केली.

समाजाध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी सर्व कार्यकारी समितीला त्यांच्याकडून भेटवस्तू दिली. श्रीमती वृंदा जयकर, श्रीमती वंदना नवलकर, श्रीमती स्वाती जयकर, विश्वस्त तसेच सल्लागार सौ. उर्वशी धराधर यांजकडून सामोसे व फ्रुटी देण्यात आली.

देणग्यांचे वाचन सौ. छाया विजयकर; तर आभार प्रदर्शन संयुक्त चिटणीस सौ. नूतन कीर्तिकर यांनी केले. थंडगार स्वादिष्ट कुल्फी खाल्ल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ
श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ
सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्री. जयपाल जयंतराव तळपदे यांजकडून त्यांच्या भगिनी कै. श्रीम. आशा गजानन जयकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त रु. ५०१/-

✶ श्री. गिरीश शंकर कोठारे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ सौ. अस्मिता राहुल प्रधान यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

सर्व देणगीदारांचे आभार

(पान २ कॉलम ४ वरून)

अहिल्याबाई होळकरांनी आपल्या सरदारांना निरोप पाठवला होता की, मी एक स्त्री आहे म्हणून माझ्याबरोबर यायचं नसेल तर हातात बांगड्या भरा म्हणून. खरं तर राजकारण्यांनादेखील या बांगड्यांची आवड व भीती एकाचवेळी असते. विरोधात असताना नामर्द सत्ताधाऱ्यांचा माज उतरविण्यासाठी विरोधकांना मंत्र्यांच्या हातात बांगड्या भरण्याची फार खुमखुमी असते. तर हेच विरोधक जेव्हा सत्ताधारी बनतात तेव्हा आपल्याला कोणी बांगड्या तर आहेर देणार नाहीत ना; या चिंतेत सदैव असतात.

तर असं हे बांगड्यांचे भावविश्व सर्वव्यापी आहे. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत. ते तितकं सर्वव्यापी आहे तितकच गुंतागुंतीचंही आहे. त्याचं चित्रण या लेखात करणं शक्य नाही. बघाना, म्हणता म्हणता किती लांबला हा लेख! पण आजकाल बांगड्यांचं अप्रूप थोडं कमी होत चाललंय असं मला वाटतं. नवीन मॉडर्न जनरेशनला जीन्स व टीशर्टवर बांगड्या सूट होत नाहीत असं वाटतं. बांगड्यांची जागा आता ब्रेसलेटने घेतली आहे. पण ब्रेसलेटमध्ये बांगड्यांसारखा भावनिक ओलावा नाही हे नवीन पिढीला कधी कळणार?

✳

## अभिनंदन

✶ डॉ. सौ. सुमन नवलकर यांच्या 'नि:शब्द' कादंबरीला अमरावतीचा सुदाम सावरकर स्मृतिपुरस्कार लाभला.

✶ आर्किटेक्ट उज्ज्वला गोविंदराव आगासकर यांचा 'गेट वे ऑफ इंडिया' वरील विस्तृत लेख 'लोकप्रभा'त प्रसिद्ध झाला.

✶ श्री. शीतल तळपदे यांना लागोलाग तीन वर्षे झी गौरव नाट्य पुरस्कार मिळाले. यंदाचा पुरस्कार 'अमर फोटो स्टुडियो' या नाटकाच्या प्रकाशयोजनेसाठी आहे. 'माझी आई तिचा बाप'ची प्रकाशयोजनाही त्यांचीच आहे.

✶ (श्री. अंबर कोठारे) महेश कोठारे, आदिनाथ कोठारे आणि सौ. उर्मिला कोठारे यांच्या सिनेक्षेत्रातील कारकिर्दीचा कोठारे घराणे असा गौरवाने उल्लेख या पुरस्कार सोहळ्यात झाला.

सर्वांचे अभिनंदन.

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळ साखर दिला

२८-०३-१७ श्री. महेश गौतम नायक. डॉ. कु. मीताली प्रदीप विजयकर
२८-०३-१७ श्री. राहुल किरण आगासकर कु. हिमाली रवींद्र रेळे (आं. ज्ञा.)

### नांदा सौख्यभरे

२१-२-१७ श्री. प्रसाद राजेंद्र कोठारे कु. तेजश्री सुधाकर साटम (आं. ज्ञा.)

### विवाह सुवर्ण महोत्सव

२४-०३-१७ श्री. तेजपाल रमाकांत कोठारे, कु. तेजस्वीनी माधवराव धुरंधर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०३-०३-१७ | श्री. चंद्रकांत केशवराव राव, | वय ८०, | दादर टी.टी. |
| ०६-०३-१७ | श्रीमती मीना मधुकर धैर्यवान | वय ८६, | माहीम |
| २७-०३-१७ | श्रीमती प्रभा चंद्रकांत तळपदे | वय ७३, | विलेपार्ले |

(पान ४ कॉलम ३ वरून)

विषय - हिन्दी चित्रपट गीत
प्रथम क्रमांक - कु. वरुण राकेश राणे
द्वितीय क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे
तृतीय क्रमांक - कु. आदिल जितेश तळपदे
क - गट - १५ वर्षावरील
विषय - मराठी-हिन्दी चित्रपट गीत - विषय - पायल, घुंगरू
प्रथम क्रमांक - सौ. बिंदीया सचिन जयकर
द्वितीय क्रमांक - सौ. सुहास नंदकुमार विजयकर
तृतीय क्रमांक विभागून - श्रीमती सुरूपा राणे - देवरुखकर, सौ. रजनी नितीन कोठारे
५) फॅन्सी ड्रेस स्पर्धा (वेळ ३ मि.)
अ - गट - ५ ते ८ वर्षे
प्रथम क्रमांक विभागून - कु. चैतन्या नितीश कीर्तिकर, कु. किमया अपूर्व कोठारे
द्वितीय क्रमांक विभागून - कु. पर्जन्य पवन कीर्तिकर, कु. यथार्थ मंदार कोठारे
तृतीय क्रमांक - कु. अश्विन असित तळपदे
ब - गट - ९ ते १५ वर्षे
प्रथम क्रमांक - कु. वरुण राकेश राणे
द्वितीय क्रमांक - कु. प्रणाली राकेश राणे
तृतीय क्रमांक विभागून -कु. आंचल शैलेश तळपदे, कु. रितिका राहुल जयकर
क - गट - १५ वर्षावरील
प्रथम क्रमांक - श्री. जयपाल जयवंत तळपदे
द्वितीय क्रमांक - श्रीमती सुरुपा राणे - देवरुखकर
६) एकपात्री अभिनय स्पर्धा
अ - गट - ५ ते ८ वर्षे
विषय - सभिनय गीत सादर करणे
(ॲक्शन साँग)
प्रथम क्रमांक - कु. अवंती असित तळपदे
द्वितीय क्रमांक - कु. पर्जन्य पवन कीर्तिकर
तृतीय क्रमांक - कु. किमया अपूर्व कोठारे
ब - गट - ९ ते १५ वर्षे
विषय - गोष्ट सांगणे
प्रथम क्रमांक - कु. वरूण राकेश राणे
द्वितीय क्रमांक विभागून - कु. रितिका राहुल जयकर, कु. आंचल शैलेश तळपदे
तृतीय क्रमांक - कु. आदील जितेश तळपदे
क - गट - १५ वर्षावरील
प्रथम क्रमांक - श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर
द्वितीय क्रमांक - श्रीमती. सुरूपा राणे - देवरुखकर
तृतीय क्रमांक - श्रीमती क्षमा पदमकुमार कोठारे

सर्व उपस्थितांना कॉफी देण्यात आली. यावेळी स्पर्धकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

(पान ५ कॉलम २ वरून)

की, लक्झरी बस हा आंग्ल शब्द मी एकदाही वापरला नाही!) अर्ध्या वाटेवर चहा कॉफी घेऊन व गप्पागोष्टी करत तिन्हीसांजेला केव्हा मुंबईची वेस ओलांडली हे कळलेच नाही. एक गोष्ट आवर्जून सांगाविशी वाटते की एक उत्तम उपक्रम जो सोशल क्लबने राबविला आहे, त्याचा सर्व ज्ञातीयांनी योग्य तो लाभ घ्यावा ही विनंती. कळावे लोभ असावा.

आपला,
रंजन खंडेराव विजयकर
सांताक्रुझ
(भ्रमणध्वनी : ९३२२८३९९८५)

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67